आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

८ एप्रिल २०२६ -बुधवार

**ठळक बातम्या**

- पतधोरण आढावा समितीच्या बैठकीनंतर व्याजदर सव्वा ५ टक्क्यांवर ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय

- आसाम, केरळम आणि पुद्दुचेरीमध्ये उद्या होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

- इराणबरोबरच्या दोन आठवड्यांच्या सशर्त युद्धविरामाची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

- युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात तेजी, कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण

**आणि**

- सर्व भारतीय नागरिकांनी इराणमधून लवकरात लवकर बाहेर पडावं, असं परराष्ट्र मंत्रालयाचं आवाहन

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं व्याजदर जैसे-थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पतधोरण आढावा समितीच्या ३ दिवसीय बैठकीत झालेले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. त्यानुसार रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीनं एकमतानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवर तर चालू आर्थिक वर्षात हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील, अशी शक्यता रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. पश्चिम आशियातल्या युद्धामुळे वाढलेल्या इंधनाच्या किंमती, एल निनोमुळे देशातल्या पावसावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता यामुळं महागाईचा दर वाढू शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.*

*पश्चिम आशियातल्या संघर्षामुळं देशाच्या आर्थिक वृद्धीदरावर विपरीत परिणाम होईल, असं मत गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मांडलं आहे. या संघर्षावर wait and watch अशी भूमिका घेतानाच तिकडच्या परिस्थिती बाबत सजग राहून संभाव्य आव्हानांवर लक्ष ठेवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतल्याचं गव्हर्नर म्हणाले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून पूर्वी पेक्षा परिस्थिती अधिक चांगली असल्याचंही त्यांनी नमूद केलं. युद्धाच्या काळात सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांमुळं युद्धाचा परिणाम कमी व्हायला मदत झाल्याचंही ते म्हणाले.*

*आधीच्या आर्थिक वर्षांच्या तुलनेत गेल्या आर्थिक वर्षात रुपयाचं अवमूल्यन अधिक झाल्याचं त्यांनी आज सांगितलं. परकीय चलन बाजारपेठेत अतिरीक्त हस्तक्षेप न करण्याची रिझर्व्ह बँकेची भूमिका कायम असून रुपयाच्या विनिमय दरासाठी कुठलीही पातळी ठरवली नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे तरुणांमध्ये स्वयंरोजगार वाढीस लागल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. या योजनेमुळे नवउद्योजकांना योग्य संधी मिळाल्यानं ते आत्मनिर्भर झाले आणि देशाच्या प्रगतीत योगदान देत आहेत. हेच या योजनेचे यश असल्याचं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेला ११ वर्ष होत आहेत. देशातल्या सूक्ष्म उद्योजक आणि लघु व्यवसायांना आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशानं ८ एप्रिल २०१५ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली.

या योजनेमुळे देशातल्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच अनेक व्यक्तिगत उद्योजकांसाठी कर्जव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे विनातारण कर्ज मिळत असल्यानं लहान व्यापारी, स्टार्ट्अप तसंच सुक्ष्म आणि लघु उद्योजक अधिक सक्षम झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. गेल्या ११ वर्षांत या योजनेअंतर्गंत आतापर्यंत ४० लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याचं ५८ कोटींहून अधिक कर्ज वितरित केलं असून त्याचा लाभ सुमारे १२ कोटी युवकांना झाल्याचं शहा यांनी म्हटलं आहे. या लाभार्थींमध्ये दोन तृतियांश महिला आहेत. यातूनच महिला सशक्तीकरण आणि आत्मनिर्भरतेच्या मार्गावरील हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं शहा यांनी नमूद केलं आहे.

**<><><><><>**

प्रादेशिक स्तरावर विकासाला गती देण्यासाठी केंद्र आणि राज्यांमध्ये अधिक समन्वयाची गरज असल्याचं नीती आयोगाचे अतिरिक्त सचिव राजीव सिंग ठाकूर यांनी सांगितलं. ते नवी दिल्लीत वेल्डिंग अँड कटिंग तंत्रज्ञान परिषदेत बोलत होते. सहयोग देणारी व्यासपीठं आणि नीती आयोगाकडून मिळणारी धोरणात्मक मदत, राज्यांमध्ये औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उत्प्रेरक म्हणून कार्य करत राहील, असं ते म्हणाले. उत्पादन आधारित प्रोत्साहन योजना आणि 'मेक इन इंडिया'सारख्या उपक्रमांनंतरही संशोधन आणि विकास सारख्या क्षेत्रात अधिक प्रयत्नांची गरज असल्याचेही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आसाम, केरळम आणि पुद्दुचेरीमध्ये उद्या होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तयारी प्रशासनकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, केरळममध्ये मतदानादरम्यान सर्व नियमांचं कसोशीनं पालन करण्याच्या सूचना आयोगानं दिल्या आहेत.

आसाममध्ये १२६ विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या मतदानासाठी उभारण्यात आलेल्या मतदानकेंद्रावर दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना निवडणूक अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

पुद्दुचेरीमध्ये उष्णतेची लाट असल्यानं मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांनी योग्य ती काळजी घेण्याची तसंच मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्याची सूचना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पश्चिम बंगालमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख तसंच राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज भवानीपूर इथून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

इराणबरोबरच्या दोन आठवड्यांच्या सशर्त युद्धविरामाची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. होर्मुझच्या सामुद्रधनीतून सागरी वाहतुकीला परवानगी देण्याची अट ट्रम्प यांनी घातली आहे. मात्र, या युद्धविरामावर द्विपक्षीय सहमती असायला हवी, असं ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं. हा संघर्ष आता थांबवण्याच्या जवळ येऊन पोहोचल्याचे संकेतही ट्रम्प यांनी दिले. दुसरीकडे इराणवरचे हल्ले थांबवल्यास इराण युद्धविरामासाठी सहमती देईल, असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे. दोन आठवड्यांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाणार असल्याचंही ते म्हणाले.

इराणबरोबरच्या दोन आठवड्यांचा युद्धविरामाला इस्रायलनेही पाठिंबा दिला आहे. मात्र, हिजबोल्ला संघटनेबरोबरच्या संघर्षामुळे लेबनॉनबरोबर मात्र युद्धविराम करता येणार नसल्याचंही इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं आहे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनीही या युद्धविरामाचं स्वागत केलं असून पश्चिम आशियातल्या संघर्षात सहभागी झालेल्या प्रत्येक देशाने युद्धविरामाच्या अटींचं पालन करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतर जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. ब्रेंट क्रूड तेल ५ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांनी घसरून १०३ डॉलर ४२ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे. तर अमेरिकेत निर्यात होणारं तेलं जवळपास साडे आठ टक्क्यांनी घसरून १०३ डॉलर २५ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे. युद्धविरामानंतर भारतीय शेअर बाजारात मात्र जोरदार तेजी पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये २ हजार ८०० पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ८००पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली.

**<><><><><>**

सर्व भारतीयांनी लवकरात लवकर इराण सोडावा असा सल्ला परराष्ट्र मंत्रालयानं दिला आहे. भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहून आणि त्यांनी सांगितलेल्या मार्गांचा वापर करूनच बाहेर पडावं, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. दूतावासाशी चर्चा केल्याशिवाय कोणत्याही आंतरराष्ट्रीय भूसीमेकडे जाण्याचा प्रयत्न करू नका, असंही मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सांगितलं आहे. मदतीसाठी भारतीय दूतावासानं दिलेले मोबाईल नंबर असे -
**९८९१२८१०९११५**, **९८९१२८१०९१०९**, **९८९१२८१०९१०२** आणि **९८९९३२१७९३५९**.
तसंच **cons.tehran@mea.gov.in** या ईमेलवरही संपर्क साधता येईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायन्टंस यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीत अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सचा २७ धावांनी पराभव केला. गुवाहाटी इथे बसरपारा मैदानावर झालेल्या या सामन्यात पावसामुळे व्यत्यय आल्यानं ११ षटकांचाच सामना खेळवला गेला.

**//<><><><><>//**